25 JUN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाकडून सहा क्रमिक पुस्तके प्रकाशित

## इतिहास अभ्यास मंडळाची कामगिरी; बी. ए. भाग-२ अभ्यासक्रमाचा समावेश

**सकाळ वृत्तसेवा**



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बी. ए. भाग -२ च्या इतिहासाची पुस्तके व स्वयंअध्ययन साहित्याचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के. यावेळी शेजारी व्ही. एन. शिंदे, चंद्रवदन नाईक, महादेव देशमुख, अवनीश पाटील, सुरेश शिखरे, विभा अंत्रेडी, आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाने बी. ए. भाग - २ साठी तयार केलेली सहा क्रमिक पुस्तके आणि तीन स्वयंअध्ययन साहित्य पुस्तकांचे आज कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन झाले. ज्या गतीने क्रमिक पुस्तकांची निर्मिती केली, त्याच पद्धतीने आता दर्जेदार ई-कन्टेन्ट निर्मिती करण्यासाठीही प्रयत्न करावेत, असे आवाहन डॉ. शिर्के यांनी केले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. चंद्रवदन नाईक यांनी केलेल्या आवाहनाला इतिहासाच्या शिक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिल्यामुळेच प्रवेश प्रक्रिया सुरू असतानाच क्रमिक पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे शक्य झाले आहे.'

या कार्यक्रमास कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मानव्यविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, मंडळाचे अध्यक्ष डॉ. नाईक, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, अभ्यास मंडळे विभागाच्या प्रभारी उपकुलसचिव विभा अंत्रेडी, डॉ. कविता गगराणी, दीपक काशीद, विनय शिंदे, उमेश भोसले, दिलीप मोहाडीकर, नितीन रणदिवे, मुफीद मुजावर, चांगदेव बंडगर, योगेश पवार उपस्थित होते.

### प्रकाशित पुस्तके, स्वयंअध्ययन साहित्य

प्रकाशित पुस्तकांमध्ये बी. ए. भाग - २ च्या सत्र ३ आणि ४ साठीच्या अतुल्य भारत (डॉ. धीरज शिंदे, स्वाती सरोदे), मराठा लोककला आणि वस्तुसंग्रहालयाची ओळख (डॉ. सुरेश शिखरे), आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती (डॉ. तानाजी हवलदार, रणजित माने, स्वाती सरोदे), पर्यटन आणि सांस्कृतिक वारसा (डॉ. मधुकर विठोबा जाधव, रामचंद्र घुले), आधुनिक भारताचा इतिहास (डॉ. आरती नाडगौडा, अजितकुमार जाधव, संदीप जाधव, श्री. शिखरे) यांचा समावेश आहे. या पुस्तकांचे संपादनाचे कार्य डॉ. चंद्रवदन नाईक यांनी पाहिले. दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षक केंद्राच्या मराठा लोककला, आधुनिक भारताचा इतिहास, आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास या तीन स्वयंअध्ययन साहित्य पुस्तकांची निर्मिती केली आहे.

25 JUN 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रचंड माहितीच्या विश्लेषणास तज्ज्ञांची गरज

## आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेत सूर; यशस्वी सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** २१ व्या शतकात डाटा प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे, तितक्याच प्रमाणात त्याच्या गतिमान संख्याशास्त्रीय विश्लेषणाचीही आवश्यकता आहे. समाजाच्या समस्याही मोठ्या आहेत. त्या सोडविण्यासाठी या क्षेत्रामध्ये सामाजिक जाणिवेच्या भावनेतून, आधुनिक ज्ञानसाधनांच्या आधारे काम करणाऱ्या संशोधक, विश्लेषकांची गरज असल्याचा सूर शिवाजी विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेत उमटला.

विद्यापीठात १९ जूनपासून 'स्टॅटिस्टिकल मेथड्स, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' या व्यापक विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेची प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत यशस्वी सांगता झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.



शिवाजी विद्यापीठात तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेमध्ये देश-विदेशांतून संख्याशास्त्रज्ञ, संशोधक, अभ्यासक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

परिषदेमध्ये अमेरिका, मलेशिया, ग्रीस या देशांसह भारतभरातील विविध विद्यापीठांमधून संख्याशास्त्रज्ञ, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले. या परिषदेत विविध सत्रांमध्ये आधुनिक संख्याशास्त्राशी निगडित अनेकविध विषयांवर चर्चा करण्यात आली. तज्ज्ञ मार्गदर्शकांबरोबरच शासकीय सेवेत कार्यरत वरिष्ठ अधिकारी, रिझर्व्ह बँक, उद्योग, व्यवसाय, फायनान्स, इकॉनॉमिक्स, वैद्यकीय, अभियांत्रिकी इत्यादी क्षेत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या तज्ज्ञांनीही आपापल्या अनुभवातून संख्याशास्त्राची भावी दिशा कशा स्वरूपाची असेल आणि त्यामध्ये संधी मिळविण्यासाठी कोणत्या प्रकारची तयारी करावी लागेल, या दृष्टीने मांडणी केली. शुक्रवारी सायंकाळच्या सत्रात देश-विदेशांतील पाहुण्यांसाठी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. डॉ. शशीभूषण महाडिक यांनी स्वागत केले, तर डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.

25 JUN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दहा दिवसांत 'फोटोकॉपी', महिन्याभरात पुनर्मूल्यांकन

## तंत्रज्ञानाच्या वापराने वाढली गती; विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची कामगिरी

कोल्हापूर : पेपर सोडविल्यानंतर त्यात अपेक्षित गुण मिळाले नाहीत. सात-आठ गुण कमी पडल्याने एखाद्या विषयात अनुत्तीर्ण झाल्यास पुनर्मूल्यांकन केल्यास त्यात गुणांची वाढ होईल, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांना असते. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे पुनर्मूल्यांकनासाठी पदवी अभ्यासक्रमांना शिक्षण घेणारे विद्यार्थी अर्ज करतात. त्यांना उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत (फोटोकॉपी), मूल्यांकन वेळेत करून देण्यासाठी परीक्षा मंडळाने अर्ज स्वीकारण्यापासून मूल्यांकनाच्या प्रक्रियेपर्यंत तंत्रज्ञानाचा वापर केला. त्याने विद्यार्थ्यांच्या हातात दहा दिवसांत 'फोटोकॉपी', तर महिन्याभरात पुनर्मूल्यांकनाचा निकाल मिळत आहे. तंत्रज्ञानाच्या वापराने या प्रक्रियेने गती घेतली असल्याचे समोर आले.



फॅक्ट चेक

संतोष मिठारी

### अर्ज व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया ऑनलाईन

पदवी असो की पदव्युत्तर अभ्यासक्रम, त्याचा निकाल जाहीर झाल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांना पुनर्मूल्यांकन करावयाचे आहे त्यांनी पहिल्यांदा फोटोकॉपीसाठी अर्ज करावयाचा असतो. फोटोकॉपी मिळाल्यानंतर आठ दिवसांत पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करावा लागतो. त्यात अर्ज ऑनलाईन, तर शुल्क पेमेंट-गेटवेद्वारे भरता येते. पुनर्मूल्यांकन ऑनस्क्रीन स्वरूपात होते. त्यामुळे पूर्वी मॅन्युअली पद्धतीने होणाऱ्या प्रक्रियेपेक्षा फोटोकॉपी देण्याची आणि पुनर्मूल्यांकनाची गती वाढली आहे. फोटोकॉपी देण्याची मुदत पंधरा दिवसांची असून, ती आता आठ ते दहा दिवसांत मिळत आहे. पुनर्मूल्यांकन प्रक्रियेसाठी दोन महिन्यांची मुदत असून, ती प्रक्रिया सरासरी महिन्याभरात होत आहे.

### एक टक्का गुण बदलाचे प्रमाण

एखाद्या विषयात अनुत्तीर्ण झाल्यानंतर अथवा अपेक्षित श्रेणी मिळाली नाही, तर विद्यार्थी पुनर्मूल्यांकनाचा पर्याय निवडतात. त्यात श्रेणीपेक्षा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक आहे. कला, वाणिज्य, विज्ञान या पारंपरिक अभ्यासक्रमांच्या तुलनेत फोटोकॉपी आणि पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करण्यामध्ये अभियांत्रिकी, फार्मसी, लॉ, आर्किटेक्चर अशा विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. परीक्षा मंडळाकडे पुनर्मूल्यांकनासाठी प्रत्येक सत्रात अर्ज करणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये ज्यांच्या गुणांमध्ये विद्यापीठ नियमाच्या अनुषंगाने बदल होतो अशा विद्यार्थ्यांचे प्रमाण एक टक्का इतके आहे.

"तंत्रज्ञानाच्या वापरामुळे फोटोकॉपी, पुनर्मूल्यांकनाची प्रक्रिया निश्चितपणे गतिमान झाली आहे. विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये बदल होण्याचे प्रमाण एक टक्क्यांपर्यंत आहे. फोटोकॉपी देण्याची आणि पुनर्मूल्यांकन करण्याच्या प्रक्रियेचा कालावधी आणखी कमी करण्याचा आमचा प्रयत्न सुरू आहे.

**- डॉ. अजितसिंह जाधव,**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ

"ऑनलाईन प्रक्रियेमुळे वेळ निश्चितपणे वाचत आहे. मागील काही सत्रात पुनर्मूल्यांकनाला विलंब, त्यात चुका झाल्याच्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत. उत्तरपत्रिकांचे ऑनलाईन मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकनात चुका, घोळ होणार नाही याची दक्षता विद्यापीठाने घ्यावी.

**- वेदांत कुलकर्णी,** जिल्हा संयोजक, अभाविप

### नवी सुधारणा होणार

विद्यापीठाच्या परिनियमातील दकक १०६ (ब) नुसार पुनर्मूल्यांकनामध्ये एखाद्या विद्यार्थ्याच्या गुणात दहा टक्के गुण वाढले अथवा कमी झाले तरच गुणबदल स्वीकारला जातो. आता त्यामध्ये सुधारणा होणार आहे. दहा टक्के गुण वाढले, तर ते समाविष्ट केले जातील. मात्र, दहा टक्के गुण जर कमी झाल्यास त्या विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकनावेळी असलेले गुण तसेच ठेवण्याचा विचार सुरू आहे. सध्या दोन विषयांच्या पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करता येतो. पण, विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार तिन्ही विषयांना अर्ज करता येईल या प्रकारातील विचार परीक्षा मंडळाच्या विचाराधीन आहे. याबाबतचे प्रस्ताव कुलगुरू कार्यालयाला सादर केले जातील. त्यांना मान्यता मिळाल्यानंतर या सुधारणा लागू होणार आहेत.

### या कारणांनी गुणांत होतो बदल

- पहिल्या परीक्षकाने उत्तरपत्रिका तपासल्यानंतर पुन्हा दुसऱ्या परीक्षकाकडूनही ती तपासली जाते. या दोन्ही परीक्षकांमधील गुणदानातील फरक, परीक्षकाकडून उत्तरपत्रिकेच्या आतील पानांवरील गुण काहीवेळा वरील पानावर घेणे राहून जाते, उत्तरांचा काही भाग तपासायचा राहून जातो, हे दुसऱ्या परीक्षकाच्या लक्षात आल्यानंतर ते तपासून गुण देणे किंवा बेरीज चुकणे, आदी कारणांमुळे गुण कमी किंवा वाढणे असे बदल होतात.

### २०२२-२३ मधील चित्र

- उन्हाळी सत्रातील अर्ज
- फोटोकॉपी ...... १५४३५
- पुनर्मूल्यांकन ..... ८९०७
- हिवाळी सत्रातील अर्ज
- फोटोकॉपी ....... ११८३१
- पुनर्मूल्यांकन ..... ६८९०

### २०२३-२४ मधील चित्र

- उन्हाळी सत्रातील अर्ज
- फोटोकॉपी ...... १२३९३
- पुनर्मूल्यांकन ..... ७३३१
- हिवाळी सत्रातील अर्ज
- फोटोकॉपी ....... १०३०४
- पुनर्मूल्यांकन ..... ६२७४

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्रामार्फत एम.बी.ए.ची १३ जुलै रोजी फेरप्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ च्या एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी रिक्त जागांकरिता रविवार, दि. १३ जुलै रोजी फेरप्रवेश परीक्षेचे आयोजन केल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली. एम. बी. ए. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे प्रवेश इच्छुकांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन व प्रोडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहे. पदवी परीक्षेत विद्यार्थ्यास खुल्या प्रवर्गातून ५० टक्के, तर आरक्षित प्रवर्गातून ४५ टक्के गुण आवश्यक आहेत.

लोकमत

# एमबीएसाठी १३ जुलै रोजी फेरप्रवेश परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षासाठी एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी रिक्त जागांसाठी १३ जुलैला केंद्रामध्ये फेरप्रवेश परीक्षेचे आयोजन केल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

या अभ्यासक्रमाला विद्यापीठ अनुदान आयोग आणि अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषदेची मान्यता आहे. खुल्या प्रवर्गातून ५० टक्के आणि आरक्षित प्रवर्गातून ४५ टक्के गुण असणारे विद्यार्थी या प्रवेशासाठी पात्र आहेत. विद्यार्थी, नोकरदार, गृहिणी, उद्योजक, व्यावसायिक, प्रोफेशनल आदींनी सोमवार (दि. ७ जुलै)पर्यंत https://sukapps.unishivaji.ac.in/pgentrance/#/login या लिंकवर परीक्षेसाठी अर्ज करावेत. MHT-CET /ATMA CET दिलेल्यांना एम.बी.ए. (डिस्टन्स) साठी थेट प्रवेश मिळेल.

पुढारी

# विद्यापीठाकडून आजअखेर ५३० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर सुमारे ५३० अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी बीएस्सी., बीबीए., एमबीए (इंटिग्रेटेड), बी.टेक आदी तीन अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला २०५ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, दि. २४ रोजी बीएस्सी. (ॲनिमेशन), बीएस्सी. (फूड टेक्नॉलॉजी) आदी सहा अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

लोकमत

# सहा अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने सहा पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे निकाल मंगळवारी जाहीर केले. आतापर्यंत ५३० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केलेले आहेत. विद्यापीठाच्या बी. एस्सी., बी.बी.ए. आणि एम.बी.ए. इंटिग्रेटेड प्रोग्रॅम तसेच बी. टेक. अशा तीन अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध १२ परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी २०५ विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

## दैनंदिनी

● **समता परिषद :** शाहू सेना आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने समता परिषद. 'वदले शाहू छत्रपती' या विषयावर इंद्रजित सावंत यांचे व्याख्यान, स्थळ : शाहू सिनेट हॉल, शिवाजी विद्यापीठ. **वेळ :** सकाळी ११ वाजता.